# फादर्स डे निमित्त कविता

**- सागर साबडे** (लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया)



असतो तो तेंव्हा नसते काही
विचारायची त्याला हिंमत
अन त्याच्या बोलण्याची
तो गेल्यावर कळते किंमत

असते तशी जवळीक
पण कधीच नाही तो दाखवत
डोळ्यात दाटले मेघ जरी
पाणी कधीच नाही वाहावत

त्याची दुःख तो उरी पुरतो
होतो आपल्यासाठी आभाळ
नाही कळत आपल्याला
कारण आपण करंटे नाठाळ

तो करत जातो त्याची कामे
मुकाट्याने न बोलता
सगळे कसे आपसूक मिळते
आपल्याला न मागता?

गोंजरायला असतेच आई
कुशीत कधी शिरायला
पण तिच्या मागे ठाम तो
हे नाही ठाव आपल्याला

एक दिवस आपल्याला
तो मागे सोडून जातो
'होते तुझे आजोबा कसे'
नातवास त्याच्या सांगत बसतो

***